लोकमत
छत्रपती संभाजीनगर, बुधवार, दि. २२ जानेवा

# सुतावरून स्वर्ग गाठला; तीन हजार गुन्ह्यांचा छडा

## शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जातोय तपास

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** खून, खंडणीसाठी पळवून नेणे, दरोडा, चोरी आदी घटना अधून-मधून घडत आहेत. घटना घडल्यानंतर आरोपींच्या मुसक्याही आवळण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, काही क्लिष्ट प्रकरणात कोणताही पुरावा जवळ नसतानाही गुन्ह्याची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२४ मध्ये तब्बल ३ हजारपेक्षा अधिक गुन्हे उघडकीस आणले आहेत.

जिल्ह्यात अवैध धंद्याविरूद्ध कारवाईची कडक भूमिका पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी घेतली आहे. गुन्हे घडू नयेत, तसेच गुन्हेगारांवर वचक बसवा, या उद्देशाने अचानक विशेष कोंबिंग ऑपरेशनही राबविण्यात येत आहे. त्यामुळे फरार, पाहिजे असलेले आरोपी पोलिसांच्या गळाला लागत आहेत. मात्र गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यातील आरोपीच्या मुसक्या आवळण्यातही पोलिसांना यश आले आहे.

जानेवारी २०२४ मध्ये हिंगोली तालुक्यातील डिग्रस वाणी येथील ट्रिपल मर्डर प्रकरणाचा उलगडा, डिसेंबर २०२४ मध्ये औंढा ना. तालुक्यातील नागेशवाडी शिवारातील अनोळखी महिलेच्या खून प्रकरणात कोणताही पुरावा जवळ नसताना या गुन्ह्यातील आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे.




**३१३० गुन्हाची उकल**

जिल्ह्यात २०२४ या वर्षात ३ हजारपेक्षा अधिक विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले होते. यातील तब्बल ३ हजार १३० गुन्ह्याची उकल करून आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे.

## मॉलमधील बिलावरून उलगडली खुनाची घटना

औंढा ना तालुक्यातील नागेशवाडी शिवारात अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला होता. मयत महिलेचा खून झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी केवळ मॉलमधील बिलावरून आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

## तपासात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचीही मदत

गुन्ह्याची उकल करण्यासाठी सर्वच बाजूंनी तपास करण्यात येतो. आता तर गुन्ह्याची उकल करण्यात आधुनिक तंत्रज्ञानाचीही मदत घेतली जात आहे.

## जिल्ह्यात वर्षभरात दाखल व उघड गुन्हे

| गुन्हा | दाखल | उघड |
|---|---|---|
| खून | २० | १९ |
| खुनाचा प्रयत्न | ३६ | ३६ |
| दिवसा घरफोडी | ०३ | ०२ |
| रात्री घरफोडी | ३८ | १६ |
| जबरी चोरी | १६ | १६ |
| दरोड्याची तयारी | ०८ | ०८ |

## कार्यपद्धती बदलल्याने पोलिसांच्या हाताला यश

गुन्ह्याची उकल करण्यासाठी बहुतांश वेळा खबऱ्यांनी दिलेल्या माहितीवर अवलंबून रहावे लागत होते. मात्र पोलिसांनीही तपासाच्या कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे गुन्ह्याची उकल करण्यात पोलिसांना यश आले.



## घरफोडी, दरोडा प्रकरणातील आरोपी अटक

जिल्ह्यात घरफोडी करणाऱ्या टोळीला काही दिवसांपूर्वीच पोलिसांनी पकडले होते. एका सराफा व्यापाऱ्यास मारहाण करून सोने लुटणाऱ्या टोळीलाही पोलिसांनी अटक केली होती. दरम्यान, तंत्रशुद्ध तपास, घटनास्थळावरील पुरावे, आधुनिक तंत्रज्ञान आदींच्या मदतीने तपास केला जात आहे.